विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | दामले, हरि जनार्दन |
| प्रकाशक | : | सध्दर्म प्रकाशन |
| प्रकाशन वर्ष | : | १९९३ |
| वर्ष | : | अठ्ठाविसावें |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : ९८**

Registered with the Registrar of News-paper for India. under R.N. 20770/71

# सद्धर्म

**त्रैमासिक**

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

|| त्रैलोक्यं मंगलं कुरु || नामूलं लिख्यते किंचित्

वर्ष अठ्ठाविसावें

अंक दुसरा

आषाढ १९१५

जुलै १९९३

वार्षिक ऐच्छिक देणगी

किमान दहा रुपये

## कडूवृक्षाचीं दोन गोड फळें...

संसार कटुवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे।
सुभाषितरसास्वादः संगतिः सुजनैः सह ||

संसार-प्रपंच हा एक प्रचंड वृक्ष आहे. तो नेहमीं कडवट फळांनीं बहरलेला असतो. पण कडुफळांनीं भारावलेल्या वृक्षावर दोन अमृत-मधुर फळें असतात. अमृतप्राशनाचा आल्हाद आणि समाधान देणारीं सुभाषितें व सुजन सज्जनांची संगती, हीं ती दोन फळें.

रणरणत्या वाळवंटांत वाळूप्रमाणें प्रपंचांत कर्णकटु मनस्ताप देणाऱ्या घटनांचीं वर्णनें करणारीं काव्यें, इतस्ततः विखुरलेलीं असतात, तापदायक दुष्ट दुर्जनही मोठ्या प्रमाणात असतात. पण वाळवंटांत जशी मधेमधें हिरवळ आणि निर्मल शीतल झरे असतात त्याप्रमाणें दुष्ट काव्यांच्या व दुर्जनांच्या पसाऱ्यांत मधेंमधें कोठेंतरी सुभाषितें आणि सुजन असतातच. त्यांचा आपण शोध केला पाहिजे. त्यांच्या आश्रयाला गेलें पाहिजे. काव्यांचा-सुभाषितांचा आस्वाद आणि सज्जनांची संगति मानवाचें जीवन तृप्त व आनंदमय करीत असतात.

## या अंकांत...

१) नमामि नमः नमस्कार ................ २
२) विठ्ठलं चिन्तयामि ...................... ३
३) लष्कराच्या भाकऱ्या .................... ८
४) कोणे एके काळीं ....................... १०
५) इंटरव्ह्यू .................................. ११
६) आम्हीं वैकुंठवासी ..................... १३
७) दुःख देवासी सांगावें .................. १६

## कृपया

१. मनिऑर्डर श्रीधर भालचंद्र आणि कंपनी, कापडाचे व्यापारी, प्रार्थना समाज, मुंबई ४ या पत्यावरच पाठवावी. मनीऑर्डरचे कूपनवर आपला पूर्ण पत्ता व पूर्ण नांव अगत्यानें लिहावें. ग्राहक नवा की जुना याचा उल्लेखही कृपया करावा.
२. देणगी शक्यतों चेकनें 'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट' या नावानेच पाठविणे.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
ह. ज. दामले, संपादक 'सद्धर्म'
खत्री चाळ, दोन हातीजवळ
३२४, वि. प. रोड, मुंबई ४०० ००४

# नमामि नमः नमस्कार...

'नमामि शारदां देवीम्' 'वंदेमातरम्' देवी शारदेला नमस्कार करतों. मातेला-भारतमातेला नमस्कार करतों, या व अशा नम् या वन्द धातूंची क्रियापदें वापरण्यांत येतात, तेथें सर्व ठिकाणी 'अहम्' मीं हा कर्ता अध्याहृत असतो. मीं शारदेला वा भारत मातेला नमस्कार करतों असा अर्थ असतो.

'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा 'सूर्याय नम' वगैरे ठिकाणी नमः या अव्ययसदृश नम् धातूच्या भाववाचक (भावे) धातुसाधिताचा क्रियापदाऐवजीं उपयोग करण्याची प्रथा आहे.

देवापुढें नतमस्तक होऊन डोळे मिटून हात जोडतों (तेव्हां नमस्कार करतों असें म्हणत नाहीं) कोणी परिचित वयानें बरोबरीचा किंवा मोठा सद्‌गृहस्थ रस्त्यांत भेटला तर हात जोडतों व 'नमस्कार' एवढाच शब्द उच्चारतों (नमस्कार करतों असें म्हणत नाहीं.)

वस्तुतः नमामि, नमः आणि नमस्कार या शब्दांचा वरील तीनही उदाहरणांत मीं नमस्कार करतों हाच अर्थ अभिप्रेत असतो. परंतु नमामि किंवा वंदे म्हणून हात जोडणें किंवा साष्टांग नमस्कार करणें आणि कांहीं न बोलतां नमस्कार करणें किंवा नुसतें 'नमः' म्हणून नमस्कार करणें यांत महत्वाचा आणि मूलभूत फरक आहे.

कसा तो पहा – अमरकोशांत 'नमो नतौ' नमः शब्द नति या अर्थी दिला आहे. नति म्हणजे नम्रता. नम्रता हा जीवनाच्या स्थैर्याचा अत्यावश्यक घटक आहे. 'अंगिं नम्रता सदा असावी' व 'महापुरें झाडें जाती तेथें लोहाळें वाचती' या संत वचनांनीं तेंच प्रतिपादन केलें आहे. नमधातु, नमः हें धातुसाधित वा कांहीं न बोलतां केलेला नमस्कार या सर्वांचा नम्रतेची अभिव्यक्ति हा अर्थ असला तरी त्या अभिव्यक्तीच्या स्वरूपांत खूपच अंतर आहे.

तो असा अहं देवं नमामि' हा कर्तरी प्रयोग आहे. त्यांत कर्त्याला प्राधान्य आहे. म्हणजेच त्याचा अहंकार, अहंपणा तेथें जागृत असतो. स्वाभाविकपणें कर्माला (देवाला) गौणता येते आणि क्रियासुद्धां (हात जोडण्याची वा दंडवत घालण्याची) कर्तृगामी – कर्त्याला अनुसरणारी असते.

ॐ नमो भगवते वासुदेवाय ही वाक्यरचना भावे प्रयोगासारखी आहे. भावाला-भावनेला क्रियेला प्राधान्य देणारी आहे. कर्त्याला, कर्तृत्वाच्या अहंकाराला तेथें अस्तित्वच नसतें. कर्तरिवाक्यप्रयोगांत कर्त्याला, कर्मणिवाक्यरचनेंच कर्माला (कारण तेथें कर्मच कर्ता असतें) प्राधान्य तर भावे प्रयोगांत (वाक्यरचनेंत) केवळ क्रियेलाच प्राधान्य असतें. तेथें अहंकाराचा सुतरां संबंध नसतो. क्रिया क्वचित अहंकारमूलक किंवा अहंकारप्रेरित असूं शकेल पण तिला मुळांत तिला अहंकार नसतो. ती स्वाभाविक आपोआप घडूं शकते.

म्हणूनच आजकालच्या कवींच्या तोंडून 'जेथें दिव्यत्वाची प्रचीति तेथें माझे कर जुळती' असे स्वयंस्फूर्त सहजोद्‌गार बाहेर पडले. कवि हात निरहंकारपणें स्वयंप्रेरणेनें जुळले असें म्हणतो. 'जोडले' असें म्हणत नाहीं.

निरहंकारपणें 'अहं' सोडून देवापुढें नत होतां हा 'नमः' याचा गूढार्थ आहे.

निदान देवापुढें अलौकिक व्यक्तिमत्वापुढें तरी अहंकार सोडून नत व्हावें. त्यांत समाधान आहे. कल्याण आहे.

# विठ्ठलं चिन्तयामि...

समचरणसरोजम् सान्द्रनीलाम्बुदाभम्।
जघननिहितपाणिं मण्डनं मण्डनानाम्॥
तरुणतुलसिमालाकंधरं कंजनेत्रम्।
सदयधवलहासं विठ्ठलं चिन्तयामि॥

श्रीमदाद्यशंकराचार्य.

महाराष्ट्राचें कुलदैवत विठोबा. 'विठोबा पंढरीचा राणा आणि ती पंढरी वारकरी सांप्रदायिकांची काशी. निवृत्ति-ज्ञानदेवांपासून एकनाथ, नामदेव तुकारामापर्यंतच्या संतश्रेष्ठांचें आद्य ज्ञानपीठ.

तेथें आज युगानुयुगें 'विटेवरि उभा कटिवरि हात' अशा स्थितीत असलेल्या विठोबानें 'काय मौजेचा पंढरिनाथ' असें म्हणत दर्शन घेत होते. आजही घेत आहेत. त्यांची आजही 'ब्रम्हानंदी टाळी' लागत आहे. परब्रम्हानंदाचा अनुभव घेत आहेत.

त्या विठ्ठलाचें 'विठु माझा लेकुरवाळा', 'विठोबा माऊली', 'विठोब्बा माऊली', 'विठाई माऊली', 'तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा' (पाडस) अशा अनेक शब्दांनीं व रूपांनी भावभोळ्या संतांनीं वर्णन केलें आहे.

त्या विठ्ठलाचें शंकराचार्यांनी आरंभी दिलेल्या श्लोकांत केलेलें वर्णन भावमधुर तर आहेच, शिवाय भगवत्तत्वाचें मूलभूत स्वरूप स्पष्ट करणारें आहे — समचरण अवस्थेंत कमरेवर हात ठेवून विश्वव्यापक परब्रम्हाचें प्रतिक असलेली ही विठ्ठलाची मूर्ति भक्तांना दर्शन देण्याकरतां परतत्त्वाचा साक्षात्कार घडविण्याकरतां युगानुयुगें उभी आहे. तहानेनें व्याकुळलेल्या प्राणिमात्रांची तहान भागविण्याकरतां अमृतमधुर जलाचा वर्षाव करतां कटिबद्ध आणि उताविळ असलेल्या जलभरित नीलवर्ण मेघमालेप्रमाणें तिची अंगकांति आहे. त्रिदोषनाशक मंदमधुर सुगंध देणारी वैजयन्ती माला गळ्यांत आहे. नेत्र भृंगांना मधुपानाचा आनंद देणाऱ्या कमलाप्रमाणें आहेत आणि ज्याच्या मुखमंडलावर दयाशील वृत्तीचा साक्षात्कार घडविणारें निर्मल स्मितहास्य विलसत आहे या परब्रम्हलिंग विठ्ठलं चिंतयामि — परब्रम्हाचें प्रतीक विठ्ठलाचें मी चिंतन करतों — मनन करतो.

शंकराचार्यांनी दुसऱ्या एका श्लोकात-

''महायोगपीठे तटे भीमरथ्या।
वरं पुण्डरीकाय दातुं मुनीन्द्रैः
समागत्य तिष्ठन्तमानन्दकन्दम्
परब्रम्हलिंगं भजे पांडुरंगम्॥

असें वर्णन केलें आहे.

त्याचा संदर्भ असा आहे — नास्तिक, मूर्तिभंजक व मूर्तिपूजा विरोधकांनी सर्व समाजीवन व्याकुळ केलें. उध्वस्त केलें. समाजाची निर्मिति, अस्तित्व आणि विकास पारस्परिक सामंजस्यमूलक सद्भावावर आधारित असतो. तो सद्भाव नष्ट झाला तर समाज निराधार होऊन पत्यांच्या बंगल्याप्रमाणें कोसळतो नष्ट होतो.

देवच नाहीं मग तो मूर्तीत कसा असणार? मग त्या मूर्ती तोडल्या काय आणि फोडल्या काय, काय बिघडणार आहे?

पण देवाचें अस्तित्व नाकारलें म्हणजे पाप-पुण्य आणि तन्मूलक सत्कार्यांची, सद्भावाची व सेवाभावाची प्रवृत्ति निराधार ठरते, नष्ट होते. अशा एका प्रसंगी

भगवान् अनेक मुनिजनांसह भीमरथी नदीच्या (चंद्रभागेच्या) तीरावर अवतीर्ण झाले. मातापित्याच्या सेवेंत मग्न असलेल्या पुण्डरीक ऋषीला वर देण्याकरतां, त्याला सहाय्य करण्याकरतां अवतीर्ण झाले. दुसरा ही एक अर्थ वरील श्लोकाच्या रचनेवरून सूचित होतो, तो असा: अनेक तपस्वी मुनिजनांनीं नास्तिकांचा प्रतिकार करण्याकरतां सेवाभावी पुण्डलिकासारख्यांना 'बल' देण्याकरता एका महान् भक्तियोगाचें पीठ स्थापन केलें आणि तेथें 'विठ्ठलाची' स्थापना केली. त्याच्या सान्निध्यांत त्या योगपीठानें भक्तीचे प्रेमाचे पारस्परिक सहकार्याचे सेवाभावाचे मळे बहराला आणले, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेवासारखे. सावता माळ्यासारखे अनेक टपोर खरे मुक्तामणि निर्माण केले आणि त्यांच्यामुळें समाज अनेक वर्षे स्थिरावला सुखावला.

पुण्डरीकाला वर देण्याकरतां भगवान स्वयं अवतरला. असो किंवा मुनिजनांनी त्याची प्रतिष्ठापना केली असो, त्यांतून जो ध्वन्यर्थ सूचित होतो तो मननीय आहे.

आस्तिकता, कृतज्ञता, पारस्परिक साहचर्य आणि सेवाभावी वृत्ति समाजांत असतेच. ती संपूर्णपणें कधींच नष्ट होत नाहीं. अगदी वेदकालापासून या क्षणापर्यंतच्या घटनांचा आढावा घेतला तर माणुसकी, सेवाभाव यांचा पूर्णपणें नाश झाल्याचें आढळत नाहीं. वृत्रासूर-इंद्र, दैत्य-देव, रावण-राम यांचा प्राचीन काळ, अलेक्झांडर-पौरस, मोगल-मराठे, इंग्रज-भारतीय यांचा अर्वाचीन काळ आणि भाषिक, प्रांतीय वादांतून निर्माण झालेल्या भारतीयांच्या आपआपसांतील संघर्षाचा वर्तमानकाळ पाहिला तरी सर्वच्या सर्व मानव समाज मानवतेपासून दुरावला आहे, सहकार्य, सेवाभाव यांपासून दुरावला आहे असें दिसत नाहीं. सत्प्रवृत्ति समाजातून आजवर केव्हांही संपूर्णपणें नष्ट झाल्या नाहींत आणि नष्ट होणारही नाहींत. सत्प्रवृत्तींप्रमाणें अपप्रवृत्तीसुद्धां प्राणिमात्राचा एक अविभाज्य घटक आहेत. त्यांच्यांत समतोल असणें आवश्यक असतें. अपप्रवृत्ती वाढल्या तर सत्प्रवृत्ती टिकविणें-वाढविणें हें विचारवन्तांचें कर्तव्य असतें. नास्तिकवादानें देश ढवळून निघाला. नास्तिक बहुसंख्य झाले तरी महाराष्ट्रांत चंद्रभागेच्या तीरावर एक पुण्डरीक नावाचा तपस्वी मातापित्यांची सेवा करीत समाजाला आधारभूत असलेल्या श्रद्धेवर उभारलेल्या कुटुंब संस्थेचे रक्षण करीत होता. तें पाहून भारतांतील त्याच्या वृत्तीशीं व कृतीशीं समरस असलेले अनेक ऋषिमुनि त्याच्याभोवतीं गोळा झाले. त्यांनी तेथें योगपीठ स्थापन करून समाजांत सत्प्रवृत्ति वाढविण्याचा संघटित प्रयत्न केला, आणि प्रयत्नाला विठ्ठलाचें अधिष्ठान दिलें हें विठ्ठलाचें शंकराचार्यांनी केलेल्या ध्यानाचें-चिंतनाचें व पुंडरीकाच्या रूढ कथेचें रहस्य आहे.

वरील रहस्याचें आकलन व स्पष्टीकरण करण्याकरता 'विठ्ठल' शब्दाचा अर्थ पहाणें अत्यावश्यक आहे. भक्त पुंडलिकानें फेकलेल्या विटेवर उभा आहे म्हणून 'विठ्ठल' असा रूढ अर्थ आहे. आल्या

अतिथीला बसायला आसन द्यावें असा सर्वमान्य संकेत आहे. संस्कृत भाषेंत आसनाला 'विष्टर' असा शब्द आहे आणि त्याचा पवित्र दर्भाचें आसन असा विशिष्ट अर्थ आहे. पुंडरीक एक तपस्वी होता. (तो व्यवसायानें कुंभार होता असें कोठेंही वर्णन नाहीं. अर्थात पाहुण्याला आसन म्हणून 'वीट' देणें संभवनीय नाहीं.) पाहुणा आलेला पाहताच त्यानें हाताशीं असलेलें विष्टर (दर्भासन) पुढें केलें. पण वर देण्याकरतां, वृद्ध रुग्ण मातापित्यांच्या सेवेंत-शुश्रुषेंत मग्न असलेल्या पुंडलिकाला सहाय्य करण्याकरतां आलेला विठ्ठल आसनावर न बसतां सहाय्याच्या संधीची प्रतीक्षा करीत उभा रहाणेंच योग्य होतें. सहाय्याकरता जाणारा सामान्य माणूसही आसनावर स्वस्थ बसून न राहतां उभा राहून मदत करण्याच्या पवित्र्यांत उभा राहत असतो. मग एका व्यक्तीच्या रूपानें साकार झालेला परमेश्वर बसून कसा राहील !!

अशा रीतीनें विष्टरावर-दर्भासनावर-विटेवर (विष्टरचें वीट हें प्राकृत रूप आहे) उभा असलेला तो 'विठ्ठल' हें एक नवीन नांव रूढ झालें.

वीट जसा घराचा प्रमुख घटक तसा विठ्ठल हा साऱ्या विश्वाचा आधार. प्रमुख घटक. विटेशिवाय घर नाहीं तसेंच विठ्ठला-शिवाय विश्व नाही. सामान्यांना विठ्ठलाचें दिसलेलं रूप विटेवरी उभा असें होतें.

पण तत्त्वज्ञ साक्षात्कारी शंकराचार्यांना त्याचें रूप दिसलें तें 'वित्+स्थल'. वित् म्हणजे ज्ञान. चैतन्य त्याचें स्थान ते 'वित्स्थल' त्याचें प्राकृत रूप विठ्ठल. विठ्ठलाची मूर्ति म्हणजे चैतन्यमय ज्ञानरूप परब्रम्हाचें स्थान. परब्रम्हाचें प्रतिक. साकार स्वरूप. परब्रम्हाचें लिंग म्हणजे प्रतिक तो हा विठ्ठल चैतन्याचा गाभा या रूपांत त्यांना साक्षात्कार झाला. विठ्ठलाच्या रूपांत त्यांना परब्रम्हाची अनुभूति आली, साक्षात्कार झाला आणि ते विठ्ठलाच्या चिंतनात मग्न झाले.

विटेवरि उभा म्हणून किंवा वित्+स्थल म्हणून विठोबा असो तो विश्वात्मक परमेश्वराचा अवतार आहे. एक आगळा वेगळा आविष्कार हें खरें. त्याचा इतर आविष्कारांच्या मत्स्य, कूर्मवराहादि अवतारांपेक्षा वेगळेपणा कसा आहे याचा विचार अत्यंत उद्‌बोधक आहे. यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानम-धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥ जेव्हां धर्माला ग्लानि येते, मलिनता येते, गौणत्व प्राप्त होतें आणि अधर्माची भरभराट होते. (त्याची भरमसाट वाढ होऊन) तो धर्माचें स्थान पटकावतो, तेव्हां भगवान् स्वतः अवतार घेतो हें सत्य आहे. परंतु प्रत्येक अवताराचे वेळीं अधर्म हा भिन्न भिन्न रूपानें निर्माण झालेला आहे हें अवतार कार्याच्या स्वरूपावरून स्पष्ट होतें.

उदाहरणार्थ, वामनावतार झाला त्या वेळीं बलिराजा उत्तम राजा होता. प्रजेला पीडा देत नव्हता, परंतु प्रजेला ऐहिक सुखोपभोगांत मग्न ठेवीत होता. खा प्या चैनींत रहा असें सांगत होता आणि प्रजेला ऐहिक-वैषयिक सुखोपभोगांची सामुग्री मुक्त हस्तानें वाटीत होता. त्यामुळें भोग-

वृत्ति बळावून समाजधारणेला अत्यावश्यक असलेल्या त्यागवृत्तींचा लोप होण्याची परिस्थिति निर्माण झाली होती. म्हणून त्यागमूर्ती वामनाच्या रूपानें भगवान् अवतीर्ण झाले. भोगवादी बलिराजाला युद्धाशिवाय पराभूत केलें आणि त्याग-प्रवृत्तीला प्रतिष्ठा मिळवून दिली.

रावणाच्या काळांत भोगवृत्तींतूनच निर्माण झालेल्या आसुरी अत्याचारी वृत्ति बळावल्या. त्या सामोपचारानें दूर करणें अशक्य झालें. मूर्तिमंत क्षात्रधर्माच्या रूपानें 'राम' अवतीर्ण झाले आणि अनिष्ट अत्याचारी प्रवृत्ति नष्ट करून सत्प्रवृत्तींना सुरक्षित-प्रतिष्ठित केलें.

जरासंध, शिशुपाल, कंस, दुर्योधन इत्यादिकांच्या काळांत आपलें, आपल्या कुटुंबाचें, वंशाचें प्रभुत्व टिकविण्याकरता सर्वसामान्य प्रजेचें हित-अनहित न पाहतां स्वैराचार करण्याची प्रवृत्ति बळावली. आपल्या हिताकरतां वाटेल तें करण्याची प्रवृत्ति फोफावली. राज्यापेक्षां प्रजेपेक्षां 'राजाला' अधिक महत्त्व प्राप्त झालें. हें राजेपणाचें वर्चस्व मोडून टाकण्याकरतां भगवान् कृष्ण एका गोपाळाच्या रूपानें अवतीर्ण झाले. सर्व राजांना त्यांचें स्वतःचें स्थान दाखवून दिलें. स्वतःला 'सर्वेसर्वा' मानणाऱ्या राजांना धडा शिकविण्याकरतां स्वतः राजा न बनतां यादवांचें राज्य निर्माण केलें आणि कार्यभाग उरकतांच तें राज्य आणि त्याचें बलवान् सैन्य मुळासकट नष्ट केलें. कारण – उद्धरेदात्मनात्मानम् लोकांनी 'स्वयंशासित' असावें याकरतांच कृष्णाचा अवतार होता. म्हणून श्रीकृष्णांनीं आपलें राज्य आणि इतरांचा पराभव करण्यासाठीं निर्माण केलेलें बलाढ्य चतुरंग सैन्य आपल्या निर्वाणापूर्वी नष्ट केलें. नाहीतर कदाचित श्रीकृष्णाच्या निर्वाणा-नंतर त्या बलिष्ठ सैन्यानें उत्पात घडविला असता व त्यांचा 'सेनापति' जरासंध शिशुपालासारखा 'राजा' बनला असता.

वरील विवेचनावरून प्रत्येक अवताराचे वेळीं परिस्थिति भिन्नभिन्न होती व प्रत्येक अवताराचें कार्य भिन्न होतें ही गोष्ट स्पष्ट होईल.

सुप्रसिद्ध दहा अवतारांशिवाय अन्य अवतार झाले त्यांना उप-अवतार मान-ण्यात येते. स्थलकाल परिस्थिपरत्वें भिन्न-भिन्न देवतांना महत्त्व प्राप्त झालें आणि ती ती देवता अवतार म्हणून मानण्यांत आली. कलौ 'चण्डीविनायकौ' कलियुगांत चण्डी आणि विनायक (गणपति) यांना प्राधान्य प्राप्त झालें. त्यांची अवतार म्हणून गणना करण्यांत आली. तशीच दत्तावताराची स्वतंत्रपणें गणना केली गेली व त्या व अन्य उप-अवतारांवर पुराणांची ही रचना झाली हें आपण पहात आहोंत.

पंढरपुरींचा विठ्ठल-विठोबा हा सुद्धां असाच एक अवतार आहे. त्याची कर्मभूमि प्रामुख्यानें महाराष्ट्र असल्यामुळें त्याच्यावर मराठी संतांचें अप्रतिम रमणीय असें विपुल वाङ्मय निर्माण झालें. परंतु संस्कृत भाषेंत 'विठ्ठलपुराण' निर्माण झालें नाही. 'एका-दशी महात्म्य' वगैरे कांहीं ग्रंथ निर्माण झाले पण ते विठ्ठलाला विष्णुरूप मानून रचले गेले आहेत आणि त्यामुळेंच स्वतंत्र विठ्ठल पुराण केलें गेलें नसावें असें वाटतें.

शिवाय पुराण म्हटलें म्हणजे त्यांत हल्ले-प्रतिहल्ले, युद्धें शस्त्रास्त्रांचे प्रयोग विध्वंस इत्यादि गोष्टी असल्याच पाहिजेत. चमत्कारांचें पुरण घातल्याशिवाय 'पुराण' होऊं शकत नाहीं. लोकांना तें आकर्षक वाटत नाहीं. आमच्या सेवाभावी सर्वत्र अद्वैताचें, एकतेचें वारकरी तत्वज्ञान आबालवृद्धांपर्यंत, खेड्यापाड्यांतील भक्तिप्रवण शेतकऱ्यांपर्यंत पोंचविणाऱ्या विठ्ठलाच्या अवतारांत संघर्षाचा-युद्धाचा लवलेशही नाहीं. अर्थातच पुराणांची निर्मिती झाली नाहीं.

अशा या वेदोक्त वा पुराणोक्त नसलेल्या विठोबाचा विठ्ठलाचा अवतार लोकोत्तर झाला आहे. कारण इतर अवतारांच्या वेळची परिस्थिति आणि विठ्ठलावताराची वेळची परिस्थिति यांत फार मोठा फरक आहे.

आरंभीं लिहिल्याप्रमाणें नास्तिकांनीं-शून्यवाद्यांनीं सर्व समाज केवळ स्वार्थी – दुसऱ्याचा विचारही न करणारा असा बनविला होता. त्यामुळें कुटुंबसंस्था-आत्मीयता पारस्परिक सामंजस्य नष्ट होण्याच्या मार्गावर होतें. पतिपत्नी, बंधु-भगिनी इत्यादि पावित्र्यावर आधारलेलीं कुटुंब संस्थेचीं आधारभूत तत्त्वें मलिन झालीं होतीं. परस्परांविषयीचा आदर-सेवाभाव नष्टप्राय झाला होता. वडिलांची पुत्रानें सेवा कां करावी? भगिनीचें-परस्त्रीचें पावित्र्य-चारित्र्य कां टिकवावें? कां रक्षावें? रुग्णांची सेवा लोकांनीं कां करावी? ज्याचें त्यानें पहावें! या प्रवृत्तीमुळें पति-पत्नी, माता-पुत्र, बंधु-बंधु, भगिनी-भगिनी ही नातीं नष्ट होण्याच्या मार्गाला लागली आणि कुटुंबसंस्था आणि कुटुंबामुळेंच निर्माण होणारा शेजारधर्मही लोक विसरले होते. मग समाजधर्म आणि राष्ट्रधर्म कसे निर्माण होणार?

कसलाच धरबंध नसल्यामुळें त्या काळीं बौद्धिक अराजक माजलें होतें. शंकराचार्यांची अद्वैताची अद्वैतमूलक भक्तिभावाची शिकवण समाज विसरला होता. अशा वेळीं विठ्ठलाचा अवतार झाला. सर्वत्र सेवाभाव पसरत होता, त्याला प्रतिबंध करण्याकरितां सेवाभावी पुंडलिकाला वर देऊन सहाय्य करून सेवाभावी, कौटुंबिक आत्मीयतेची वाढ करण्याकरतां परमेश्वर विठ्ठलाच्या रूपानें अवतरला.

या विठ्ठलाच्या मागें शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज फौजा नव्हत्या. 'संतनका फौजा' होत्या. 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' अशा वृत्तीनें जगणाऱ्या पुंडलीकाला मदतीचा हात देणाऱ्या विठ्ठलाचा 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल' असा घोष करीत व्यक्तीव्यक्तीच्या समाजाच्या एकतेकरतां हिताकरतां वाटचाल करणारे हजारों लाखों वारकरी ही विठ्ठलाची फौज. विठ्ठलाचे परमभक्त ज्ञानेश्वर, तुकाराम सावतामाळी हे त्या फौजेचे वारकऱ्यांचे अग्रणी. ते परमेश्वराचें चिंतन करीत आपआपलीं कामें करीत रहा असें सांगत सर्वत्र फिरत होते. खेड्यापाड्यांतीलसुद्धा घरोघरीं जाऊन त्यांना आस्तिकता आणि क्रियाशीलता शिकवीत होते. आपआपसांतील हेवेदावे विसरून जा. आपण सर्वजण एक आहोंत. जें आहे तें सर्वांचे आहे असें समजा आणि सर्वांनी

## विठ्ठलाच्या अवताराचें उद्दिष्ट...

सर्वांच्या भल्यासाठी एकत्रित प्रयत्न करा असें आत्मीयतेनें मराठमोळ्या मराठी भाषेंत सांगत ही वारकरी संत मंडळी आज शेकडों वर्षे अव्याहत संचार करीत आहेत.

'कृण्वन्तो विश्वमार्यम्' संघर्षाशिवाय सर्वत्र आर्यत्वाचा-सामंजस्याचा प्रचार करण्याचें वैदिक कार्य, सर्वत्र अद्वैताचें, 'अणुमाजि ब्रम्ह', रेणुंमाजिं ब्रम्ह हें शंकराचार्यांनी प्रतिष्ठापित केलेलें तत्त्वज्ञान अशिक्षित पण भावनिष्ठ साध्याभोळ्या ग्रामीण लोकांपर्यंत पोंचविणें हे विठ्ठलाच्या अवताराचें उद्दिष्ट होतें, आहे.

विठ्ठलाचा अवतार झाला त्या काळीं असलेली परिस्थिति होती, तीच औद्योगिक क्रांतीमुळें म्हणा, विज्ञानाच्या अवास्तव वाढीमुळें म्हणा किंवा फाजील बुद्धिवादामुळें म्हणा, आज सर्वत्र निर्माण झाली आहे. या परिस्थितीत संघर्षाचा मार्ग सोडून भक्तिभावाचा प्रेमभावाचा मार्ग स्वीकारणे हाच एकमेव मार्ग. परब्रम्हाचें प्रतीक असलेल्या विठ्ठलानें सर्वांना सुबुद्धि द्यावी हेंच त्याच्यापाशीं मागणें आहे. अन्य कांही तयि मागणें नाही. पुण्डरीक वरद विठ्ठल सर्ववरद विठ्ठल व्हावा हीच इच्छा.

# लष्कराच्या भाकऱ्या...

घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणं अशी म्हण आहे. कांहीं मोबदला न घेता, दुसऱ्याचं काम करणं विशेषत: सार्वजनिक काम करणं असा त्या म्हणीचा आशय आहे. घरचं खाऊन मी लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचं काम करणार नाहीं. तसं करणं व्यवहार्य नाहीं. शहाणपणाचं नाहीं अशा संदर्भात वरील म्हण वापरली जाते.

घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या आपण होऊन भाजणं (युद्धप्रसंगीं लष्कराला लागेल तें सहाय्य करणं) हें स्वेच्छेनुसार असतं, हौशीचं असतं. परंतु जेव्हा सक्तीनं लष्कराच्या भाकऱ्या भाजायला लावलं जातं तेव्हां तेथें हौशीचा, खुशीचा किंवा आनंदाचा प्रश्नच नसतो.

अशा रीतीनं लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याला लष्कराचं काम फुकटं फाकटी करायला लावणं या अर्थी वेठीला लावणं-वेठीला धरणं असा शब्दप्रयोग रूढ झाला त्यावरून वेठबिगारी हा आजकाल बहुचर्चित शब्द प्रसिद्ध झाला आहे. भातवीत, डोंगरबिंगर वगैरे शब्दांप्रमाणे वेठबिगार हा जोडशब्द व्यवहारांत आला. मुळांत 'वेठ' हा एवढाच शब्द. तो संस्कृत भाषेंतील 'विष्टि' शब्दाचा अपभ्रंश आहे. कोशकारांनीं विष्णाति इति विष्टि: (अमर १।९।३) अशी व्युत्पत्ति देऊन वेतन न घेता केलेले कष्ट, परिश्रम असा त्याचा अर्थ दिला आहे. पारमार्थिक किंवा पारलौकिक तत्त्वज्ञानांत 'फलेच्छारहित कर्तव्यकर्म करीत राहणें' हें मुक्तीच्या साधकांना आवश्यक आहे असें आवर्जून सांगितलें आहे. लौकिक व्यवहारांत सामान्य लोकांना फलेच्छारहित कर्म करणें कठीण असतें, तरीही समाजाच्या, राष्ट्राच्या कल्याणा-

करतां (म्हणजे पर्यायानें स्वतःच्याच कल्याणाकरतां) मोबदला न घेतां अल्प-स्वल्प तरी काम करणें, कष्ट करणें आवश्यकच आहे. तसं न करतां जर कुटुंबातील, समाजातील, राष्ट्रातील सर्व व्यक्ती जर केवळ वैयक्तिक स्वार्थाच्या दृष्टीनें व्यवहार करूं लागल्या तर कुटुंब, समाज व राष्ट्र निर्माण होऊं शकणार नाहीं. म्हणून प्राचीन धर्मशास्त्रकारांनीं, समाजधुरिणांनीं 'विष्टीची' म्हणजे मोबदल्याची, वेतनाची अपेक्षा न करतां, कुटुंबाकरतां, समाजाकरितां काम करण्याची प्रवृत्ति व्यक्ती-व्यक्तीमध्ये रुजविण्याचे प्रयत्न केले.

कांहीं सूत्रग्रंथांत व पुराणांत विष्टीचे उल्लेख आढळतात. मनुस्मृतींतील पुढील श्लोक त्या दृष्टीनें मननीय आहे.

कारुकान् शिल्पिनश्चैव
शूद्रांश्चात्मोपजीविनः।
एकैकं कारयेत्कर्म मासि मासि
महीपतिः॥ मनु ७।१३८

राष्ट्राच्या हिताकरतां उत्कर्षाकरतां राजानें कोणत्या कोणत्या गोष्टी कराव्या हें सांगतांना मनूनें म्हटलें आहे — "राजानें शिल्पकार, कारागीर, शेतकरी व स्वतंत्रपणें भिन्नभिन्न व्यवसाय करून उपजीविका करणारे या सर्वांकडून महिन्यांतून एक दिवस राष्ट्राकरतां विनावेतन काम करवून घ्यावें.

प्रत्येक व्यक्तीनें राष्ट्राकरतां महिन्यांतून एक दिवस तरी विनावेतन काम केलें पाहिजे, पण जर काम चुकारपणें कोणी तसें करीत नसेल तर राजानें त्या चुकारांकडून विनावेतन काम करवून घेतलें पाहिजे, असा या श्लोकाचा अर्थ आहे. आपस्तंब सूत्रांत व विष्णु पुराण वगैरे कांहीं प्राचीन ग्रंथांतही 'विष्टीचा' उल्लेख आहे. सार्वजनिक, सामाजिक वा राष्ट्रीय कार्याकरतां महिन्यातून निदान एक दिवस विनावेतन काम करावं, पण त्या दिवशीचा अन्न-पाण्याचा खर्च शासनानें-राजानें करावा असा ही तेथें उल्लेख आहे.

समाज आणि व्यक्ति शासन-शासक आणि प्रजा यांच्यामध्यें जोंपर्यंत आत्मीयता असते तोंपर्यंत 'ही विष्टि-वेठ' जाचक ठरत नाहीं. पूर्वी ठरली नव्हती. आजही पदरचं खाऊन अगदी निरपेक्षपणें समाजाकरतां, राष्ट्राकरता राष्ट्रहित करूं इच्छिणाऱ्या पक्षांकरता-संघटनांकरतां काम करणारी सेवाभावी माणसें पुष्कळ आहेत. खरं बोलायचं तर अशा निःस्वार्थ सेवाभावी लोकांमुळेंच या बिकट परिस्थितीतही समाज टिकून आहे.

राष्ट्राच्या विकासाच्या उदात्त हेतूनें मुळांत रूढ झालेली 'विष्टि' स्वार्थी, धूर्त अशा लोकांनीं शासनकर्त्यांनी भ्रष्ट केली. तिला 'वेठ' बनविलें. व्यक्तिगत स्वार्थाकरता शक्तीच्या बळावर गरिबांकडून, असमर्थांकडून फुकट काम करवून घेण्याची प्रवृत्ति निर्माण झाली. धन, जाति, अधिकार, सत्ता इत्यादिकांच्या जोरावर प्रतिष्ठित बनलेल्या लोकांनीं त्या वेठीला 'कांहींसे प्रतिष्ठित' रूपही प्राप्त करून दिलें. पण त्यामागें, सामाजिक वा राष्ट्रीय जाणीव नसल्यामुळें त्या वेठीला बळजबरीचें स्वरूप प्राप्त झालें. वेठ घालणें या ऐवजीं 'वेठीला धरणें' अशी परिस्थिति निर्माण झाली.

## स्नेह सौहार्द कायद्यानें निर्माण होत नाहीत...

मनुष्याच्या स्वार्थी वृत्तीमुळें मनांत उदात्त स्वरूप असलेल्या 'विष्टीचें' स्वरूप बदलण्यांत आलें. वेठीला धरणें असें अन्याय्य स्वरूप प्राप्त झालें. त्याचा वैयक्तिक प्रतिकार म्हणून 'वेठ वारणें' म्हणजे कसेंबसें काम करणें. बाह्यतः काम करीत असल्याचा देखावा करणें. चुकीचें, वेडेंवाकडें काम करणें वगैरे क्लृप्त्या योजण्यांत येऊं लागल्या होत्या. आता तर कायद्यानेंच वेठबिगारी बंद करण्यांत आली आहे.

समाजविघातक स्वरूपाची वेठबिगारी कायद्यानें बंद केली हें उत्तमच झालें. पण त्या वेठीच्या मूळ स्वरूपाची विष्टीची म्हणजे दुसऱ्याकरतां, समाजाकरतां, राष्ट्राकरतां पदरमोड करूनही काम करण्याची प्रवृत्तीच नष्ट झाली आहे हें अत्यंत वाईट आहे.

कायदा अपप्रवृत्ति कदाचित नष्ट करूं शकेल, पण सत्प्रवृत्ति निर्माण करूं शकत नाहीं हेंच खरें.

आपल्या स्वार्थाकरतां दुसऱ्याकडून सक्तीने विनावेतन काम करून घेण्याची अपप्रवृत्ति कायद्याने बंद केली, पण दुसऱ्याकरतां निःस्वार्थपणे काम करण्याची प्रवृत्ति कायदा निर्माण करूं शकला नाहीं इतकेंच नव्हे, ज्याबद्दल वेतन घेतों ते कामही प्रामाणिकपणें करण्याची ही प्रवृत्तिही कायदा निर्माण करू शकला नाहीं.

वेठीस धरल्याप्रमाणें – वेठवारल्याप्रमाणें काम, आणि वेतन मात्र भरपूर आणि हक्काचें अशी आज परिस्थिति आहे.

कारण आज कायद्याचें राज्य आहे. कोठेंही जा, केव्हांही जा, जो तो कायद्याकडे बोट दाखवितो. स्नेह, सौहार्द, सौजन्य या गुणांचा कोठेंही संबंध येत नाही. अनुभव येत नाही. कारण ते कायद्यांत वसत नाहीत. कायद्याने निर्माण होत नाहीत!

# कोणे एके काळीं...

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः।

या पुरातन पावन भारत वर्षांत जन्मलेल्या श्रेष्ठ कुळांतील श्रेष्ठ व्यक्तीच्या चारित्र्यापासून जगांतील व्यक्तिमात्रानें आपण कसें जीवन जगावें याचें शिक्षण घ्यावें अशी परिस्थिति होती. एकेकाळीं धार्मिक, वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, भौतिक व आध्यात्मिक विचारांचे बाबतींत भृगु, वसिष्ठ, अगस्ति, गार्गी, मैत्रेयी, भरतमुनि, प्रभु रामचंद्र, शंकराचार्य, आर्य चाणक्य इत्यादि महात्मे जन्माला आले. म्हणून भारत जगाच्या गुरुस्थानीं होता. पण आज!!

प्रत्येक भारतीय आपलें परंपरागत स्वत्व विसरून प्रत्येक बाबतीत परकीयांचें अनुकरण करीत आहेत.

**सद्धर्म प्रकाशन, पातंजल योगसूत्र**
सुलभ मराठी भाषान्तरासह. किंमत पोस्टेजसह २४ रुपये मात्र.

# इंटरव्ह्यू...

कांहीं महिन्यांपूर्वी एका हिंदीवृत्तांत 'भारतके पंतप्रधान राजीवजीने काश्मीरके मुख्यप्रधान फारुक को साक्षात्कार के लिये बुलाया' असा मजकूर वाचला आणि दिङ्मूढ झालो. राजीव आध्यात्मिक महंत केव्हां बनले. शिष्यांना साक्षात्कार केव्हां-पासून घडवूं लागले. कांहीं उलगडेना. समजेना.

कारण साक्षात्कार संस्कृत भाषेतील पारिभाषिक शब्द. परमेश्वराचें-परब्रम्हाचें-चिच्छक्तीचें दर्शन होणें, तिच्याशी एकरूप होणें म्हणजे साक्षात्कार. योगीजनांना निर्विकल्प समाधींत जीवात्मा आणि शिवात्मा-परमात्मा एकरूप असल्याचें भान होतें त्याला साक्षात्कार म्हणतात असें वाचनांत आलें असल्यामुळें राजीव आणि फारुक यांचा साक्षात्कार ही कल्पना मनाला खटकली.

कोश काढून पाहिला त्यांत इंटरव्ह्यूला हिंदी पर्याय शब्द साक्षात्कार दिला आहे. शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापन केल्यावर राजकारभारांत घुसलेल्या उर्दू फारसी शब्दांना मराठी (संस्कृत) पर्याय शब्द देणारा 'राज्यव्यवहार कोश' पंडितां-कडून निर्माण करविला. तसाच भारत स्वतंत्र झाला. 'हिंदी' राष्ट्रभाषा झाली. तेव्हां राज्यकारभारांत घुसलेल्या इंग्रजी शब्दांना पर्यायी हिंदी शब्द निर्माण करण्या-करतां नवा कोश निर्माण करण्यांत आला. त्या 'पदनाम कोशा'ला आचार्य अत्रे 'बदनाम कोश' असें म्हणत असत त्याची आठवण झाली.

'ढेकणाला 'खटमल' हा एकच एक अर्थवाही शब्द असला तरी 'हिंदी'ला राष्ट्रभाषा मानायला तयार आहे' या प्रसिद्ध विनोदी लेखक श्री. कृ. कोल्हटकर यांच्या वाक्याची आठवण झाली.

पण एवढ्यावर स्वस्थ बसवेना. कारण वरील कोशाचे प्रमुख संपादक गाढे विद्वान होते. संस्कृत, हिंदी, इंग्रजी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होतें. शब्दांच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यांचे वाच्य, लक्ष्य, व्यंग व रूढ अर्थ यांच्या संबंधांची कार्यकारणभावाची त्यांना संपूर्ण माहिती असलीच पाहिजे. मग त्यांनी इंटरव्ह्यू शब्दाला साक्षात्कार पर्याय देतांना कोणता विचार केला असावा? यावर विचार करताना चटकन मनांत प्रकाश पडला. 'इंटर म्हणजे अन्तर्गत. (इंटर्नल ऑडिट, इंटर्नल मॅनेजमेंट यांप्रमाणे) 'व्ह्यू' म्हणजे दृश्य, दर्शन. लेखी परीक्षेत विद्यार्थी आपले मनोगत, प्रवृत्ति व विचार डावलून, गुप्त ठेवून पेपर लिहूं शकतो. उंदरा-मांजरांना भिणारा विद्यार्थी वाघाची शिकार कशी करावी वा कशी करीन हें पुस्तकी ज्ञानाच्या जोरावर लिहूं शकतो. स्वतःला आशय समजलेला नसला तरी घोकंपट्टीच्या जोरावर पुस्तकांतील वाक्यें उद्धृत करून पेपर लिहितां-सजवितां येतो. म्हणून लेखी परीक्षेत किती वाचलें आहे याची कल्पना येते. परंतु किती समजलें आहे याची परिपूर्ण कल्पना येत नाही. मौखिक परीक्षेत त्याची कल्पना येते. या परीक्षेंत प्रश्नाची पूर्वकल्पना नसते, त्यावर विचार करायला वेळ नसतो. उत्तर चुकांचें – मोघम देऊन भागत नाहीं. उत्तरावर विचारलेल्या पूरक प्रश्नांचें उत्तर द्यावें लागतें, खुलासा करावा लागतो.

शिवाय मौखिक परीक्षाकक्षांत प्रवेश

करणें उभें रहाणें, बसणें. कपड्यांची परिस्थिति, उत्तर देण्याची पद्धति यांवरून लक्षांत येणारे तसेच चेहऱ्यावरील भाव व डोळ्यांतून अभिव्यक्त होणाऱ्या मानसिक प्रवृत्ति स्वभावसिद्ध गुणधर्म यांचें साक्षात ज्ञान होतें व परीक्षार्थीचें वास्तवरूप समजतें म्हणूनच व्यक्तीच्या बाह्यतः दृष्टिगोचर न होणाऱ्या गुणधर्मांचे, स्वभावाचें, भाव-भावनांचें दर्शन होण्याकरतां 'इंटरव्ह्यू' घेतले जातात.

याबाबतींत गेल्या महायुद्धाच्या वेळी 'किंग्ज कमिशनकरतां' बोलाविलेल्या एका तरुणाची पुढील सत्यकथा मोठी उद्बोधक आहे. लेखी परीक्षेंत उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झालेल्यापैकीं कांहीं तरुणांना इंटरव्ह्यूकरतां बोलाविण्यांत आलें. त्यांत एक गोडबोले नांवाच्या तरुणाचा समावेश होता. त्याची उंची पुरी साडेसहा फूट. व्यायामानें कमावलेलें प्रमाणबद्ध आणि धाडधाकट शरीर व कांहीसा उग्र आणि निश्चयी चेहरा होता त्याचा.

नांव पुकारतांच त्यानें ढकलदरवाजा ढकलून इंटरव्ह्यूच्या हॉलमध्यें डावा पाय पुढें टाकला...तोंच अकल्पित प्रसंग ओढवला. इंटरव्ह्यू घेणाऱ्यांपैकीं एक लष्करी अधिकारी चटकन उठून पुढें आला आणि डाव्या हातानें त्या गोडबोलेचा गळा पकडला आणि उजवा हात श्रीमुखांत भडकविण्याकरतां जोरानें तोंडाजवळ नेला...हें पाहतांच त्या निर्भय तरुणानें क्षणाचाही विचार आणि विलंब न करतां आपल्या डाव्या हातानें तोंडाजवळ आलेला आफिसराचा हात पकडून उजव्या हातानें त्या लष्करी साहेबाच्या थोबाडावर सणसणीत फटका मारणार तोंच तो ऑफिसर मागें झाला आणि हंसत हंसत पुढें येऊन त्या तरुणाची पाठ थोपटीत म्हणाला. 'भलेबहाद्दर, तुझा इंटरव्ह्यू झाला. तुला शंभर टक्के मार्क्स आहेत. जा. उद्याच कॅंपमध्यें हजर हो.

लष्करांत तुझ्यासारखेच अधिकारी हवे असतात.

व्यक्तीनें आपल्या अन्तःकरणाचा आणि अन्तरात्म्याचा अन्तर्मुख होऊन मागोवा घेणें, अनुभव घेणें आणि मनाच्या द्वारा आत्म्याशीं आत्म्याच्या द्वारा परमात्म्याशीं एकरूप होणें ही साक्षात्कार शब्दांतील गूढार्थ आहे. रहस्य आहे. यांत स्वतः अन्तर्मुख होणें स्वतः आपल्या मनाचें रूप त्याचे विकार आविष्कार समजून घेणें हा अर्थ अभिप्रेत आहे. तर इंटरव्ह्यू शब्दांत दुसऱ्याच्या मनांत डोकावून त्याचें मनोगत, अन्तर्गत व्यापार व सहजप्रवृत्ति जाणून घेणें हा अर्थ अभिप्रेत आहे हें वरील उदाहरणावरून स्पष्ट होतें. दोहोंतही अन्तर्गताचें दर्शन घेणें तें समजून घेणें हें समान सूत्र आहे.

हा विचार लक्षांत घेऊनच प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. रघुवीर यांनीं इंटरव्ह्यूला जास्तींत जास्त जवळचा असा पर्याय शब्द म्हणून 'साक्षात्कार' शब्द दिला असावा असें वाटतें.

देणगी हाती देण्याचा पत्ता :

**श्री गंगाधर प्रिंटिंग प्रेस**

वेस्टर्न रेल्वे फूटब्रिजच्या समोर

• दादर, मुंबई ४०० ०२८

# आम्हीं वैकुंठवासी...

आम्हीं वैकुंठवासी आलों याचि कारणासी।
झाडूं संतांचे मारग काट्याकुट्यांनीं भरलें जग ॥

सारें विश्व काट्याकुट्यांनीं, समाज कंटकांनीं भरलें आहे. सरळ सन्मार्गी सामान्य लोकांना जीवन कठीण झालें आहे. लोकांना सन्मार्गाला लावणाऱ्या संतांना मुक्तपणानें संचार करणें कठीण झालें आहे. त्यांच्या मार्गांत समाजकंटकांनीं अडचणीचे काटे पसरून ठेविले आहेत. स्वार्थी, दुष्ट, अनैतिकतेची घाण पसरून ठेविली आहे. ते काटे, ती घाण झाडून संतांचे मार्ग स्वच्छ करावे या हेतूनेंच आम्ही वैकुंठवासी सुजन या भूतलावर अवतरलों आहोंत.

अशा अर्थाच्या या संतवचनांतील वैकुंठवासी आणि संत या शब्दांचा अर्थ समजून घेणें आवश्यक आहे. आम्ही वैकुंठात म्हणजे विष्णुलोकांत राहत होतों ते या भूतलावर आलों. याचा भूलोकापेक्षा वैकुंठ लोक वेगळा आहे असा अर्थ होतो आणि भूलोकावरील संतांना कंटकाकीर्ण मार्ग कंटकरहित करतां येत नाहीं. ती त्यांची अडचण दूर करण्याकरितां आम्ही आलों आहोंत असाही त्यांतून ध्वनि सूचित होतो. त्यावरून वैकुंठांतून आलेले आम्ही महापुरुष भूलोकांवरील संतांपेक्षा श्रेष्ठ आहोंत असें ध्वनित होतें. पण तें उचित वाटत नाहीं. 'मीतूंपण सांडुनी वेळोवेळां' वर्तन करणाऱ्या सज्जनांच्या बाबतींत तें संभवत नाहीं.

वस्तुतः सर्व प्राणिजात व वस्तुजात' हें मुळांत 'वैकुंठवासी'च असतें. कारण वैकुंठ म्हणजे विष्णूचें निवासस्थान. विष्णु (वेवेष्टि-सर्व विश्वाला अन्तर्बाह्य व्यापून रहातो तो) म्हणजे विश्वव्यापक चिच्छक्ति, चैतन्य परमेश्वर, परब्रम्ह. (परमेश्वर, परब्रम्ह) त्याच्याशिवाय 'रिताभाव कोठें नाहीं' अणुरेणूंतसुद्धा चैतन्य, चिच्छक्ति व्यापून राहिली असल्यामुळें ती नाहीं असें कोणतेंच स्थान नाहीं. याचाच अर्थ 'विश्व'हेंही वैकुंठच आहे. विष्णूचें निवासस्थान आहे.

याच संदर्भानें 'सन्त' शब्दाचा विचार करायला हवा. 'सन्तः' या संस्कृत शब्दाचें 'सन्त' हें प्राकृत (मराठी) रूप आहे. मुळात 'अस्' (असणें) या धातूचें सत् (अस्ति इति सत् जें विद्यमान आहे) हें कृदन्त रूप आहे, त्याचें (सन् सन्तौ सन्तः) प्रथमेच्या बहुवचनाचें रूप आहे. तदनुसार सचेतन साकार व्यक्ति म्हणजे सन्त असा शब्दार्थ होतो.

व्यवहारात, सदाचारी, भगवद्भक्त, आत्मज्ञानी, चैतन्यमय, परमात्म्याचा साक्षात्कार झालेले आणि म्हणूनच प्राणिमात्राच्या कल्याणाकरतां कणाकणानें व क्षणाक्षणानें देह झिजविणारी जी व्यक्ति तिला 'संत' म्हणण्याचा प्रघात आहे. तो संत शब्दाचा आहे. अस्ति म्हणजे आहे. ज्याचें अस्तित्व शाश्वत आहे. जो नेहमी भावरूपच असतो. ज्याला कधीच 'अभाव' नसतो तें 'सत्' म्हणजे परब्रम्ह त्याचा साक्षात्कार झालेले, असा लक्ष्यार्थ आहे आणि तोच रूढ अर्थात कळत नकळत गृहीत धरला जातो.

याचा निष्कर्ष असा कीं वैकुंठवासी संत

व भूलोकवासी संत असा भेदभाव नाही, त्यांच्यांत श्रेष्ठकनिष्ठपणा नाहीं. मग आम्ही वैकुंठवासी आलो याचि कारणासी याचा अर्थ काय करावयाचा ?

तो अर्थ असा – विश्वांतील प्राणिमात्राचें मूळ निवासस्थान वैकुंठ-परब्रम्ह. त्याच्या 'एकोऽहं बहुस्याम् प्रजायेय' या इच्छेनुसार तें सगुण साकार झालें. भिन्न भिन्न आकारांच्या-बुद्धिमत्तेच्या व वेगवेगळ्या भावभावनांच्या प्राण्यांच्या रूपानें प्रकट झालें. तेव्हा स्वाभाविकपणें व्यक्तिगत वैशिष्ट्य, भिन्नता निर्माण झाली. देशकाल परिस्थितीनुसार आहारात, आचारात, विचारांत भेदभाव निर्माण झाले. कांहीं केवळ वैयक्तिक सुखाचा विचार करणारे, आपल्या (वैयक्तिक) सुखाकरतां (आवश्यक म्हणून) कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा, वेळप्रसंगीं विश्वाचासुद्धां विचार करूं लागले, तर व्यक्तिगत सुखाचा विचार न करतां कुटुंबापासून विश्वापर्यंत सर्वांच्या सुखाचा विचार करूं लागले.

या संदर्भात राजा भर्तृहरीनें उत्तम, मध्यम, अधम व अधमाधम अशा चार प्रकारच्या व्यक्तींचें पुढील श्लोकांत वर्णन केलें आहे, तें मननीय आहे –

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः
स्वार्थं परित्यज्य ये।
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः
स्वार्थाविरोधेन ये ॥
तेऽमी मानवराक्षसाः परहितं
स्वार्थाय विघ्नन्ति ये।
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं
ते केन जानीमहे ॥

१) आपल्या स्वार्थाचा-सुखाचा विचारही मनांत न बाळगतां सतत दुसऱ्यांच्या सुखाचा विचार व प्रयत्न करणारे ते उत्तम सज्जन संत.

२) दुसऱ्यांच्या हिताशी-सुखाशी विरोध येऊं न देतां आपलें हित साधणारे ते मध्यम.

३) आपल्या हिताकरतां दुसऱ्यांचें अनहित-नुकसान करणारे ते अधम.

४) आणि आपलें नुकसान अकल्याण करूनही दुसऱ्यांचें नुकसान करणारे ते अधमाधम.

भर्तृहरी तर म्हणतो त्यांना काय म्हणावें (आपलें नाक कापून दुसऱ्यांना अपशकुन करणाऱ्यांना) कोणतें नांव द्यावें हें मला समजत नाही. (ते के न जानीमहे) १) सत्पुरुष (सन्त) २) मध्यमजन ३) मानवरूपी राक्षस ४) आणि राक्षसांनाही आपल्या दुष्कृत्यांनी लाजवतील असे चार प्रकारचे मानव कवीनें वर्णिले आहेत. ते यथार्थ आहेत. त्यांपैकी पहिले आणि चवथे अत्यल्प असतात, त्यांच्या मानानें तिसऱ्या वर्गातील लोक अधिक असतात. सर्वांत जास्त, बहुसंख्य लोक मध्यममार्गी असतात. त्यांना आपण मध्यमवर्ग म्हणतो. (आजच्या टक्केवारीच्या भाषेत साधारणपणें क्रमशः ५, ७५, १५ व ५ असें आहे.) हा मध्यममार्गी समाज आजकाल मध्यमवर्ग म्हणून ओळखला जातो. हा स्थितिप्रिय व स्थितिस्थापक मध्यमवर्ग समाजाचा-राष्ट्राचा 'कणा' आहे. कांही दिवसांपूर्वी अमेरिकेतील तज्ञांनी केलेल्या पाहाणीचा निष्कर्ष वाचण्यात आला. त्यात 'मध्यमवर्ग' हा खरा राष्ट्रनिष्ठ असल्याचें आढ-

रून आलें असें स्पष्टपणें म्हटलें आहे.

कारण 'भले त्यांना देऊं कांसेची लंगोटी' असा एका टोकाचा स्वीकार करीत नाहीं, त्याप्रमाणें दुसऱ्याची कांसेची लंगोटी सोडून हिरावून घेण्याच्या दुसऱ्या टोकाचाही स्वीकार करीत नाहींत.

कारण आम्ही जगूं आणि इतरांनाही जगवूं ही मध्यममार्गीयांची (मध्यमवर्गाची) मूलभूत प्रवृत्ति असते. ह्या प्रवृत्तीचे लोक अगदी आदिवासींपासून पांढरपेशा उच्चभ्रू लोकांपर्यंतच्या समाजाच्या सर्व थरांत असतात. आहेत.

पांढरपेशा समाज म्हणजे मध्यम वर्ग ही व्याख्या योग्य नाही. पेशा म्हणजे पोशाख आणि धंदा. स्वच्छ पोशाख करणारे, शिकलेसवरलेले व व्यापारधंदा करणारे. हे लोक म्हणजे मध्यममार्गी-मध्यमवर्गीय असे म्हणणें अतिव्याप्त किंवा अव्याप्त असूं शकतें. कारण 'जगूं आणि जगवूं, स्वतःचा उत्कर्ष करूं आणि इतरांच्या उत्कर्षाला हातभार लावूं' ही प्रवृत्ति मध्यमवर्गाचें लक्षण योग्य आहे.

असा हा सदसत्प्रवृत्तीची जाणीव असलेला समाजाच्या सर्व थरांत कमी जास्त प्रमाणांत पसरलेला मध्यमवर्ग सन्त ही नसतो आणि मानवरूपी राक्षस किंवा राक्षसाधमही नसतो, म्हणूनच त्यांचें जीवन कष्टप्रद असतें. जीवनमार्ग कण्टकमय असतो. सरळपणें जीवन व्यतीत करणें क्लेशप्रद होऊन बसतें आणि त्यामुळें ते तिसऱ्या वा चौथ्या प्रतीच्या लोकांत समाविष्ट होण्याचा मोठा धोका असतो.

अशा प्रसंगीं त्यांना आहेत त्याच ठिकाणीं सुखानें जगतां येईल. निदान आहेत तेथेंच राहून निष्कंटक मार्गानें जीवन सुलभतेनें व्यतीत करतां येईल असा प्रयत्न करण्याचें काम वैकुंठीचे सन्तच (भूतलावर असूनही वैकुंठवासी म्हणजे विश्वव्यापी विष्णूवर चिच्छक्तीवर नितान्त श्रद्धा आणि विष्णूच्या विश्वव्यापकतेची अनुभूति असलेले करूं शकतात.) येऱ्यागबाळ्याचे तें काम नोहे. याच अर्थानें 'आम्ही वैकुंठवासी। आलों याचि कारणासी' असें सन्तांनीं म्हटलें आहे.

सन्त एव सतां नित्यं आपदुद्धरणक्षमाः।
गजानां पंकमग्नानां गजा एव धुरंधरा॥

(नित्य येणाऱ्या आपत्तीतून सज्जनांना संतच मुक्त करूं शकतात. चिखलांत रुतत जाणाऱ्या हत्तीला स्थिर जागीं कणखरपणें उभे असलेले हत्तीच चिखलांतून बाहेर काढूं शकतात) या सुभाषिताचा हाच आशय आहे.

आजवर 'निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई। एकनाथ नामदेव तुकाराम॥' या संतांच्या मांदियाळीनें ते काम केलें आहे, त्याचा विचारवन्तांनीं मागोवा घ्यावा ही प्रार्थना.

देणगी हाती देण्याचा पत्ता :
**श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी
१४८, प्रार्थना समाज, गिरगांव
मुंबई ४०० ००४

# दुःख देवासी सांगावें...

आत्मच्छिद्रं गृहाच्छिद्रं। मतिमात्र प्रकाशयेत्।

आपले व्यक्तिगत आणि कुटुंबाचे दोष व व्यथा बुद्धिमान माणसाने लोकांत प्रकट करूं नयेत, असा संकेत आहे.

पण नदीचा पूर पाणी तीर फोडून वाहूं लागला म्हणजे ओसरतो, त्याप्रमाणें मनाचे बंध फोडून बाहेर पडल्याशिवाय मन शांत होत नाही. मग काय करावें?

दुःख देवाला सांगावें. प्रातःकाळीं नंदादीपाच्या मंद-प्रशान्त प्रकाशांत देवापुढें आपल्या मनोव्यथा निवेदन कराव्या म्हणजे मन शांत होतें.

शांत मनाला व्यथा सहन करण्याचें व त्या दूर करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें.

## सेवेसीं श्रुत होय...

नमस्कार,

सद्धर्माचा हा अठ्ठाविसाव्या वर्षाचा दुसरा अंक वाचकांचे हातीं देतांना आनंद वाटत आहे. पूर्वीप्रमाणेंच याही अंकाचें वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

अगतिकतेने सद्धर्माची वार्षिक किमान देणगी दहा रुपये करावी लागत आहे, असें मागील अंकांत लिहिलें होतें. कांहीं वाचकांनी त्याची दखल घेतलेली दिसत नाहीं. अजून पांच रुपयेच पाठवितात. कृपया त्यांनी यापुढें दहा रुपये पाठवावे ही विनंति.

वर्गणी-देणगी संपल्याचें कळविणें कार्यव्याप्तीमुळें अशक्य आहे. म्हणून ग्राहकांनी आपण होऊनच स्मरणपूर्वक पाठवावी अशी आमची नम्र विनंती आहे.

अधिक काय लिहिणें. सद्धर्मावर लोभ असों द्यावा ही प्रार्थना.

वृत्तपत्रांच्या नोंदणीनियमान्वयें (केंद्रीय १९५६) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकी-संबंधी व इतर तपशीलासंबंधी निवेदन —

१. प्रकाशन स्थळ: १२४, वि. प. रोड, मुंबई ४०० ००४

२. प्रसिद्धीचा नियतकाल: दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेला

३. मुद्रकाचे नांव: अनंत विनायक धोरे, भारतीय, १२४, वि. प. रोड, मुंबई ४

४. प्रकाशकाचे नांव: राष्ट्रीयत्व, पत्ता वरीलप्रमाणें.

५. संपादकाचे नांव: हरि जनार्दन दामले, भारतीय, १२४, वि. प. रोड, मुंबई ४०० ००४

६. एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तींसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवें व पत्ते: सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, १२४, वि. प. रोड, मुंबई ४०० ००४

मी अनंत विनायक धोरे जाहीर करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें, समजुतीप्रमाणें बरोबर आहे.

१.७.१९९३ अनंत विनायक धोरे

संपादक: हरि जनार्दन दामले
प्रकाशक व मुद्रक: अनंत विनायक धोरे, १२४, वि. प. रोड, मुंबई ४०० ००४